# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 11/11/2019 (सोमवार)
## (सकाळ)

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 12 किमी अंतरावर झुल्लर शिवार कामठी येथे दिनांक 09/11/2019 चे 23.49 वा. दरम्यान एमच–40/बीएस–0522 क्रमांकाचा ट्रॅक्टरचा चालक आरोपी नामे– संदीप धनराज चौधरी, वय 40 वर्ष, रा. याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 1 ब्रास रेती किं. 3,000/– रू. ची भरून तो वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 3,03,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक मनिराम भुरे यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक मनिराम भुरे हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 2 कि.मी अंतरावर गहुहिवरा कन्हान येथे दिनांक 10/11/2019 चे 10:00 वा. ते 10:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अभिजीत रमनलाल गांधी, वय 26 वर्ष, रा. शिवनगर, वार्ड क्र. 4 हा त्याच्या एमएच–40/बीएस 0522 क्रमांकाच्या एक्टीवा मोपेड गाडीने खेडी वरुन कन्हान कडे जात होता. फिर्यादीने गहुहिवरा पुला खाली लघुशंकेसाठी गाडीला चावी लावुन उभी ठेवली होती. दरम्यान दोन मोटारसायकल वर 4 अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीची कि. 30,000/–रू. ची ॲक्टीव्हा गाडी चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम 379, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा वरखडे 9637005303 हे करीत आहे.

2) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर शिवटेकडी पारशिवनी येथे दिनांक 08/11/2019 चे 13:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– टिकाराम गोपीचंद परतेकी, वय 22 वर्ष, रा. पारशिवनी याने त्याची एमएच–40/बीएच– 7271 क्रमांकाची मोटरसायकल शिवटेकडी पारशिवनी येथे बांधकाम करीत असलेल्या ठिकाणी उभी करून ठेवली. दाम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. 35,000/–रू. मोटरसायकल चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीताचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा बासोडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर